ePaper
कर्नाटक हायकोर्टाचा मोठा निर्णय, SC अन् ST चं वाढीव आरक्षण रद्द

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™



पान 3 वरुन...

अडीच वर्षांपासून पुनर्विकासाचा 'खोळंबा'!

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 13 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## LOC जवळ घुसखोरीचा प्रयत्न; स्फोटानंतर सुरक्षा यंत्रणा सतर्क

# पूंछमध्ये ४ दहशतवादी ठार

**महाईन्यूज | जम्मू-काश्मीर**

**जम्मू-काश्मीरमधील पूंछ जिल्ह्यात नियंत्रण रेषेवरून (LOC) भारतीय हद्दीत घुसखोरी करण्याचा प्रयत्न करत असताना झालेल्या भूसुरुंग स्फोटात चार जण ठार झाल्याचे वृत्त आहे. मृतांमध्ये लष्कर-ए-तोयबा या दहशतवादी संघटनेचा वरिष्ठ कमांडर मोहम्मद फैजान याचाही समावेश असल्याचे वृत्तसंस्थांनी अधिकाऱ्यांच्या हवाल्याने म्हटले आहे. सोमवारी कृष्णा घाटी सेक्टरमधील सतवाल-नाकी परिसरात ही घटना घडली.**



### सीमाभागातील आव्हान पुन्हा चर्चेत...

पूंछ जिल्ह्यातील ताज्या घटनेमुळे नियंत्रण रेषेवरील घुसखोरीविरोधी सुरक्षा व्यवस्थेचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे. संवेदनशील सीमाभागात भूसुरुंग, नैसर्गिक परिस्थिती आणि संभाव्य घुसखोरीचे प्रयत्न यांमुळे सुरक्षा दलांना सतत दक्ष राहावे लागते.

मिळालेल्या माहितीनुसार, काही जण नियंत्रण रेषा ओलांडून भारतीय हद्दीत प्रवेश करण्याचा प्रयत्न करत होते. याचवेळी भूसुरुंगाचा स्फोट झाला आणि चारही जणांचा मृत्यू झाला. मृतांची नावे मोहम्मद फैजान, मोहम्मद इश्तियाक, वकास आणि असीम अशी सांगण्यात येत आहेत. यापैकी फैजान हा लष्कर-ए-तोयबाचा वरिष्ठ कमांडर असल्याचे वृत्त आहे. मात्र, मृतांची ओळख आणि त्यांच्या भूमिकेबाबत अधिकृत पुष्टी होणे आवश्यक आहे.

घटनेनंतर सुरक्षा दलांनी संबंधित परिसरातील सतर्कता वाढवली असून, नियंत्रण रेषेवरील गस्त आणि निगराणी अधिक कडक करण्यात आल्याचे वृत्त आहे. संभाव्य घुसखोरीचे प्रयत्न रोखण्यासाठी सीमाभागातील हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

दरम्यान, पूंछ जिल्ह्यातील मेंढर सेक्टरमधील बसोनी परिसरातही रस्त्याच्या कामादरम्यान दोन जुने, गंजलेले भूसुरुंग आढळल्याचे वृत्त आहे. लष्कराच्या तज्ज्ञ पथकाने नियंत्रित स्फोट घडवून ते निष्क्रिय केले. पूंछमधील या घटनांमुळे नियंत्रण रेषेवरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

### सतवाल-नाकी परिसरात घटना

मिळालेल्या वृत्तानुसार, पूंछ जिल्ह्यातील कृष्णा घाटी सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळील सतवाल-नाकी परिसरात सोमवारी हा स्फोट झाला. हा भाग सीमापार घुसखोरीच्या दृष्टीने संवेदनशील मानला जातो. नियंत्रण रेषेच्या पाकिस्तानी बाजूकडून काही जण भारतीय हद्दीत प्रवेश करण्याचा प्रयत्न करत असताना भूसुरुंगाचा स्फोट झाल्याचे वृत्त आहे.

### स्फोटानंतर नियंत्रण रेषेवर सुरक्षा वाढवली

घटनेनंतर सुरक्षा यंत्रणांनी संबंधित सेक्टरमध्ये सतर्कतेचा इशारा दिला असून नियंत्रण रेषेवरील गस्त आणि देखरेख वाढवण्यात आल्याचे वृत्त आहे. संभाव्य घुसखोरीचे प्रयत्न रोखणे आणि परिसरातील परिस्थितीचा आढावा घेणे यावर सुरक्षा दलांचे लक्ष आहे. दरम्यान, पूंछ जिल्ह्यातील मेंढर सेक्टरमधील बसोनी परिसरातही भारतीय लष्कराला सीमाभागातील कुंपणाजवळ दोन जुन्या, गंजलेल्या भूसुरुंगांचा शोध लागल्याचे वृत्त आहे. रस्ता तयार करण्याच्या कामादरम्यान सकाळी ८ वाजून २५ मिनिटांनी आणि दुपारी १२ वाजून १० मिनिटांनी हे स्फोटक आढळले. त्यानंतर लष्कराच्या तज्ज्ञ पथकाने नियंत्रित स्फोट घडवून ते नष्ट केले.

### लष्कर-ए-तोयबाच्या कमांडरचाही मृतांमध्ये समावेश?

काही वृत्तसंस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, मृतांची नावे मोहम्मद फैजान, मोहम्मद इश्तियाक, मोहम्मद वकास आणि मोहम्मद असीम अशी सांगण्यात आली आहेत. यापैकी मोहम्मद फैजान हा लष्कर-ए-तोयबा या दहशतवादी संघटनेचा वरिष्ठ कमांडर असल्याचे वृत्त आहे. मात्र, मृतांची ओळख आणि त्यांची भूमिका याबाबत सर्व वृत्तांमध्ये एकसारखी माहिती नाही. त्यामुळे संबंधित व्यक्तींची ओळख आणि ते घुसखोरीच्या प्रयत्नात सहभागी होते का, याबाबत अधिकृत पुष्टी महत्त्वाची ठरते.

# पुणेकरांना आठवड्यातून एक दिवस ‘कोरडा’!

## महापालिकेचा निर्णय; १५ ऑक्टोबरपासून अंमलबजावणी, पाणी बचतीसाठी कडक निर्बंध

**महाईन्यूज । पुणे**

**एल निनोचा संभाव्य प्रभाव, पर्जन्यमानातील घट आणि राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पुणेकरांना पाणीकपातीला सामोरे जावे लागणार आहे. उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोर नियोजन करून पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी पुणे महानगरपालिकेने आठवड्यातून एक दिवस संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या १५ ऑक्टोबरपासून, म्हणजेच गुरुवारपासून या निर्णयाची अंमलबजावणी होणार असल्याचे वृत्त आहे. राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांना पाणीवापरात किमान १० टक्के कपात करण्याचे निर्देश दिल्यानंतर महापालिकेने हा पर्याय स्वीकारला आहे. उपलब्ध पाणी पुढील पावसाळ्यापर्यंत पुरविण्यासाठी नागरिकांनीही काटकसरीने पाणी वापरण्याचे आवाहन करण्यात येत आहे.**



पावसाच्या अनिश्चिततेमुळे पुढील काळात पाण्याची मागणी आणि उपलब्ध साठा यांचा ताळमेळ राखण्याचे आव्हान प्रशासनासमोर आहे. राज्य शासनाने ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत उपलब्ध पाण्याचे नियोजन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देत इतर वापरांवर निर्बंध घालण्याची भूमिका प्रशासनाने घेतली आहे. आठवड्यातील एक दिवस पाणीपुरवठा बंद ठेवल्याने उपलब्ध जलसाठ्यावरील ताण कमी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी बांधकामांसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करण्यास मनाई करण्यात आली आहे. बांधकाम व्यावसायिकांनी त्याऐवजी प्रक्रिया केलेले सांडपाणी किंवा नियमानुसार उपलब्ध पर्यायी जलस्रोतांचा वापर करावा. सार्वजनिक आणि खासगी वाहन धुलाई केंद्रांनाही पिण्याच्या पाण्याचा वापर टाळण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. वाहन धुणे, अंगण किंवा पदपथ स्वच्छ करणे यांसारख्या कामांसाठीही पिण्याचे पाणी वापरू नये, असे आवाहन करण्यात येत आहे.

सार्वजनिक आणि खासगी जलतरण तलाव तसेच उद्यानांच्या देखभालीसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर बंद ठेवण्यावर भर दिला जाणार आहे. ज्या गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) कार्यरत आहेत, त्यांनी प्रक्रिया केलेल्या पाण्याचा बागकाम आणि स्वच्छतागृहांतील फ्लशिंगसाठी पुनर्वापर करावा. पाण्याच्या टाक्या भरल्यानंतर पाणी वाहून जाणार नाही, याची काळजी घ्यावी. आवश्यकतेनुसार स्वयंचलित फ्लोट व्हॉल्व्ह बसवून पाण्याचा अपव्यय टाळावा.

घरगुती पातळीवरही पाणी बचतीची जबाबदारी नागरिकांना पार पाडावी लागणार आहे. आंघोळ, भांडी आणि कपडे धुण्यासाठी आवश्यक तेवढेच पाणी वापरणे, नळ सुरू ठेवून पाणी वाया न घालवणे आणि घरातील फ्लश टँक, नळजोडण्या व पाइपलाइनमधील गळती तातडीने दुरुस्त करणे आवश्यक आहे. तुलनेने स्वच्छ असलेल्या वापरलेल्या पाण्याचा योग्य ठिकाणी पुनर्वापर करण्यावरही भर द्यावा. हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि वसतिगृहांनी पाणी बचतीच्या उपाययोजना काटेकोरपणे राबवाव्यात.

दरम्यान, सार्वजनिक ठिकाणी जलवाहिनी फुटल्यास किंवा पाणीगळती आढळल्यास नागरिकांनी तातडीने महापालिकेला कळवावे, असे आवाहन करण्यात येत आहे. अनधिकृत नळजोडण्या आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे. एकीकडे आठवड्यातून एक दिवस पाणीपुरवठा बंद राहणार असल्याने नागरिकांना पाण्याचे नियोजन करावे लागणार आहे, तर दुसरीकडे पाणी बचतीचे नियम पाळून उपलब्ध जलसाठा जपण्याचे मोठे आव्हान पुणेकरांसमोर उभे राहिले आहे.

### पाणी बचतीसाठी निर्बंधांचा बडगा!

दरम्यान, भाजपने राहुल गांधींच्या आंदोलनावर टीका केली. भाजप प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी काँग्रेसवर SIR प्रक्रियेबाबत दिशाभूल करणारे आरोप केल्याचा आरोप केला. तसेच घटनात्मक संस्थांवर दबाव आणण्याचा प्रयत्न होत असल्याचे भाजपने म्हटले. मतदार यादी, SIR प्रक्रिया आणि निवडणूक आयोगाच्या भूमिकेवरून सत्ताधारी भाजप आणि विरोधकांमधील संघर्षामुळे दिल्लीतील राजकीय वातावरण अधिक तापले आहे.

# सोमेश्वर कारखान्यावर राष्ट्रवादीचा झेंडा; निंबूत-खंडाळ्यात दणदणीत विजय!

**महाईन्यूज । सोमेश्वरनगर**

**श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या ‘सोमेश्वर विकासपुरुष अजितदादा पवार’ पॅनलने निंबूत-खंडाळा गटात दणदणीत विजय मिळविला. या गटातून माजी सभापती प्रमोद काकडे यांनी १४ हजार ९६२, अभिजित काकडे यांनी १४ हजार ३६ आणि शिवसेना पुरस्कृत उमेदवार डॉ. वसंतराव दगडे यांनी १३ हजार ९८९ मते मिळवत विजय संपादन केला. या निकालामुळे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, विजयी उमेदवारांनी हा विजय दिवंगत अजितदादा पवार यांना समर्पित केला.**




निवडणुकीच्या सुरुवातीपासूनच निंबूत-खंडाळा गटात चुरस पाहायला मिळाली. राष्ट्रवादीच्या पॅनलसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार आणि जय पवार यांनी प्रचारात सक्रिय सहभाग घेतला होता. स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ज्येष्ठ नेत्यांनीही गावोगावी जाऊन सभासदांच्या भेटीगाठी घेतल्या. या प्रचाराचा आणि स्थानिक पातळीवरील संपर्काचा फायदा उमेदवारांना झाल्याचे मानले जात आहे.

निकाल जाहीर होताच समर्थकांनी जल्लोष केला. अजितदादा पवार यांचे छायाचित्र हातात घेत कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. फटाक्यांची आतषबाजी, पेढे वाटून आनंद साजरा करणे आणि विजयी उमेदवारांचे अभिनंदन अशा उत्साही वातावरणात विजयाचा आनंद व्यक्त करण्यात आला. विजयी तिन्ही उमेदवारांना कारखान्याच्या कामकाजाचा अनुभव आहे. प्रमोद काकडे यांनी यापूर्वी जिल्हा परिषदेत सभापतीपदाची जबाबदारी सांभाळली आहे. अभिजित काकडे यांची कारखान्याच्या संचालकपदाची ही दुसरी टर्म आहे, तर डॉ. वसंतराव दगडे यांनी यापूर्वी कारखान्याचे उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि सभासदांशी असलेल्या संपर्काचा निवडणुकीत फायदा झाल्याचे मानले जात आहे.

दरम्यान, कारखान्याच्या इतर गटांमध्येही राष्ट्रवादीच्या उमेदवारांनी आघाडी घेतल्याचे मतमोजणीदरम्यान दिसून आले. निंबूत-खंडाळा गटातील विजयामुळे पॅनलच्या समर्थकांचा आत्मविश्वास वाढला असून, उर्वरित निकालांकडेही सभासदांचे लक्ष लागले आहे.

# अडीच वर्षांपासून पुनर्विकासाचा ‘खोळंबा’!

## अडीच वर्षांनंतरही आकुर्डी-चिंचवडमध्ये कामे अपूर्ण; आधुनिक सुविधांसाठी प्रवाशांना प्रतीक्षा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत आकुर्डी आणि चिंचवड रेल्वेस्थानकांच्या पुनर्विकासाला अडीच वर्षे उलटली, तरी अनेक कामे अपूर्ण आहेत. लिफ्ट, सरकते जिने, पादचारी पूल आणि प्रतीक्षागृहांची कामे सुरूच असून, पूर्ण झालेल्या स्वच्छतागृहांच्या दर्जाबाबतही प्रवाशांच्या तक्रारी आहेत. त्यामुळे आधुनिक सुविधांच्या प्रतीक्षेत असलेल्या प्रवाशांना गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.**




पुणे-लोणावळा रेल्वेमार्गावरील महत्त्वाच्या आकुर्डी आणि चिंचवड स्थानकांवरून दररोज ४२ लोकल गाड्यांची ये-जा होते. या स्थानकांच्या विकासासाठी पहिल्या टप्प्यात पुणे विभागातील १६ स्थानकांचा समावेश करण्यात आला होता. चिंचवड स्थानकासाठी २० कोटी रुपये, तर आकुर्डीसाठी ३३ कोटी ८ लाख रुपये खर्च नियोजित आहे. फलाट, प्रवेशद्वारे, प्रतीक्षागृहे, स्वच्छतागृहे, प्रकाशयोजना आणि दिव्यांगांसाठी सुविधा विकसित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. मात्र, कामांचा संथ वेग प्रवाशांसाठी अडचणीचा ठरत आहे.

दोन्ही स्थानकांवरील फलाट क्रमांक एक व दोनच्या पृष्ठभागाचे काम सुमारे ९० टक्के, तर छताचे काम ९५ टक्के पूर्ण झाले आहे. रॅम्पसह पादचारी पुलाचे काम ७२ टक्के पूर्ण झाले असून, लिफ्ट क्रमांक दोन, तीन आणि चारची कामे अनुक्रमे ८५, ७५ आणि ५५ टक्के झाली आहेत. सरकत्या जिन्याचे काम ६० टक्के पूर्ण झाले आहे. पाणपोई, फलक, स्वच्छतागृहांचे नूतनीकरण, प्रवेश परिसर आणि तिकीट कार्यालयाशी संबंधित बहुतांश कामेही अंतिम टप्प्यात असल्याचे सांगण्यात येत आहे. चिंचवड स्थानकावर फलाट क्रमांक दोन आणि तीनदरम्यान लिफ्ट बसविण्यात आल्या आहेत; मात्र त्या अद्याप प्रवाशांसाठी खुल्या झालेल्या नाहीत. फलाट क्रमांक एक आणि तीनवरील स्वच्छतागृहांची कामे पूर्ण झाली असली, तरी दरवाजे व्यवस्थित बंद होत नसल्याच्या आणि बेसिन लहान असल्याच्या तक्रारी आहेत. प्रतीक्षालय, पदपथ आणि सरकत्या जिन्यांची कामेही बाकी आहेत.

आकुर्डी स्थानकावर फलाट क्रमांक एक आणि दोनला जोडणारा पादचारी पूल अपूर्ण आहे. जलशुद्धीकरण यंत्र बसविले असले, तरी ते बंद अवस्थेत आहे. विद्युत उपकरणे बसविण्याची कामेही पूर्ण झालेली नाहीत. त्यामुळे पुनर्विकासासाठी मोठा निधी खर्च होत असतानाही प्रवाशांना अपेक्षित सुविधांसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे.

> “चिंचवड आणि आकुर्डी रेल्वे स्टेशनच्या या दोन्ही स्थानकांच्या पुनर्विकासाच्या कामे सुरु असून अनेक बांधकामे पुर्णत्वाच्या उंबरठयावर आहेत. हे काम पुढील दोन महिन्यांत पूर्ण होतील. रेल्वे प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्यासाठी रेल्वे प्रशासन कटिबध्द आहे. नियोजीत वेळेत काम पूर्ण होतील.
>
> **- हेमंतकुमार बेहेरा, जनसंपर्क अधिकारी, पुणे.**

दरम्यान, दोन्ही स्थानकांवरील पुनर्विकासाची कामे पुढील दोन महिन्यांत पूर्ण केली जातील. प्रवाशांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी रेल्वे प्रशासन कटिबद्ध असून, नियोजित वेळेत कामे पूर्ण होतील, असे पुणे विभागाचे जनसंपर्क अधिकारी हेमंतकुमार बेहेरा यांनी सांगितले.

# यंदाच्या नवरात्रोत्सवाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड; अनेकांनी घेतली एआयची मदत

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**नवरात्रोत्सवाला सुरुवात होताच घरोघरी घटस्थापनेची लगबग सुरू झाली आहे. पूजेसाठी लागणारे साहित्य, विधींचा क्रम आणि तयारीचे नियोजन यासाठी यंदा अनेकजण कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) आधार घेत आहेत. त्यामुळे धार्मिक परंपरा जपत घटस्थापनेच्या तयारीतही आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढल्याचे चित्र दिसत आहे.**



घटस्थापनेसाठी आवश्यक साहित्याची यादी तयार करणे, पूजेतील वस्तूंची माहिती मिळविणे, विधींचा क्रम समजून घेणे आणि कोणतीही वस्तू राहू नये यासाठी एआयचा उपयोग केला जात आहे. मोबाईलवर सूचना दिल्यानंतर काही क्षणांत साहित्याची यादी उपलब्ध होत असल्याने तयारी अधिक सोपी होत असल्याचे नागरिक सांगतात.

नवरात्रोत्सवात घटस्थापनेसाठी धान्य, नारळ, फुले आणि विविध पूजासाहित्याची व्यवस्था करावी लागते. दैनंदिन धावपळीत कोणत्या वस्तू घ्यायच्या आणि पूजेचे नियोजन कसे करायचे, यासाठी एआयची मदत उपयुक्त ठरत आहे. विशेषतः पहिल्यांदाच घटस्थापना करणाऱ्यांना प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी या तंत्रज्ञानाचा फायदा होत आहे.

मात्र, पूजेच्या पद्धती आणि साहित्यामध्ये कुटुंबपरंपरा, प्रादेशिक रीतिरिवाज तसेच धार्मिक मान्यतांनुसार फरक असू शकतो. त्यामुळे एआयकडून मिळालेल्या माहितीची जाणकारांकडून खात्री करून घेणेही आवश्यक मानले जात आहे.

एकीकडे नवरात्रोत्सवातील पारंपरिक धार्मिक विधी श्रद्धेने पार पाडले जात आहेत, तर दुसरीकडे त्यांच्या तयारीसाठी तंत्रज्ञानाची मदत घेतली जात आहे. घटस्थापनेच्या नियोजनात एआयचा वाढता वापर हा बदलत्या जीवनशैलीचा आणि तंत्रज्ञानाशी जुळवून घेणाऱ्या नव्या दृष्टिकोनाचा प्रत्यय देत आहे.

### धार्मिक परंपरेला तंत्रज्ञानाची साथ

नवरात्रोत्सवात घटस्थापनेसाठी लागणारे साहित्य, पूजेचा क्रम आणि धार्मिक विधींची माहिती मिळविण्यासाठी अनेकजण कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर करत आहेत. मोबाईलवर सूचना दिल्यानंतर काही क्षणांत साहित्याची यादी तयार होत असल्याने पूजेच्या तयारीतील वेळ आणि धावपळ कमी होण्यास मदत होत आहे. विशेषतः पहिल्यांदाच घटस्थापना करणाऱ्यांना कोणत्या वस्तूंची आवश्यकता आहे, त्यांची व्यवस्था कशी करावी आणि पूजेचे नियोजन कसे करावे, याबाबत प्राथमिक मार्गदर्शन मिळत आहे.



## भूमिका

**महाराष्ट्राच्या राजकारणात महायुतीची सत्ता मजबूत दिसत असली, तरी अंतर्गत संघर्षाने तिच्या एकजुटीवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. व्यासपीठावर एकमेकांच्या हातात हात घालणारे नेते निवडणुकीच्या मैदानात मात्र स्वतःच्या पक्षाचे हित जपण्यासाठी मित्रपक्षालाच आव्हान देताना दिसतात.**

# महायुतीत 'आपले' कमी, 'माझे' अधिक!



विधानपरिषद निवडणुकीतील उमेदवारीवरून निर्माण झालेले वाद हे त्याचे ताजे उदाहरण आहे. पुणे शिक्षक मतदारसंघातील उमेदवारीचा तिढा, अमरावतीतील कुरघोडी आणि नाशिकमध्ये मित्रपक्षाच्या उमेदवाराविरोधात झालेली बंडखोरी यांमधून महायुतीतील समन्वयाचा अभाव स्पष्ट होतो.

सत्तेत एकत्र असणे आणि मनाने एकत्र असणे, या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. भाजपला राज्यभर संघटन विस्तारायचे आहे. शिंदेसेनेला आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून शिवसेनेवरील दावा मजबूत करायचा आहे. अजित पवार गटाला राजकीय प्रभाव कायम ठेवायचा आहे. प्रत्येक पक्षाची महत्त्वाकांक्षा असणे स्वाभाविक आहे; मात्र त्यासाठी मित्रपक्षाचे नुकसान होत असेल, तर युतीच्या विश्वासार्हतेवर परिणाम होतो.

बुलढाण्यात भाजपच्या श्वेता महाले आणि शिंदेसेनेचे संजय गायकवाड यांच्यातील संघर्ष असो किंवा नंदुरबारमध्ये विकासकामांसाठी निधी मिळत नसल्याची व्यक्त झालेली नाराजी, या घटना सत्ताधारी पक्षांमधील समन्वयाच्या मर्यादा दाखवतात. स्थानिक पातळीवरील वर्चस्वाची लढाई राज्यस्तरीय युतीला कमकुवत करू शकते. महायुतीचे संख्याबळ मोठे असले, तरी केवळ आकड्यांच्या जोरावर राजकीय स्थैर्य टिकत नाही. सरकार संख्येने चालते; परंतु युती विश्वासाने टिकते. मित्रपक्षाच्या उमेदवाराला अधिकृत पाठिंबा देऊन प्रत्यक्षात त्याच्या विरोधात काम केले जात असेल, तर युतीचा अर्थच संपुष्टात येतो. अशा प्रकारांमुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण होतो आणि मतदारांचाही विश्वास डळमळीत होऊ शकतो.

दुसरीकडे, विरोधकांना महायुतीतील या मतभेदांचा राजकीय फायदा घेण्याची संधी मिळते. सरकारविरोधातील नाराजीला दिशा देण्यासाठी विरोधकांना स्वतंत्रपणे मोठे प्रयत्न करण्याची गरजही उरत नाही. सत्ताधारी पक्षांतील संघर्षच त्यांच्या अडचणी वाढवू शकतो. अजित पवार गटातील ज्येष्ठ नेते आणि नव्या नेतृत्वातील समन्वयाचाही प्रश्न महत्त्वाचा आहे. प्रभावी नेते आणि मजबूत संघटन असूनही अंतर्गत मतभेदांमुळे पक्षाची सामूहिक ताकद कमी होण्याचा धोका आहे. महायुतीसमोर आज सर्वांत मोठे आव्हान विरोधकांशी लढण्याचे नाही, तर स्वतःमधील अविश्वास दूर करण्याचे आहे. जागावाटप, उमेदवारी आणि विकासनिधी यांबाबत स्पष्ट धोरण, नियमित समन्वय आणि मित्रपक्षांच्या राजकीय अस्तित्वाचा आदर आवश्यक आहे. अन्यथा प्रत्येक निवडणूक ही सहकार्याची संधी न ठरता वर्चस्वाच्या संघर्षाचे मैदान बनेल.

सत्तेची गणिते तात्पुरता विजय मिळवून देऊ शकतात; पण दीर्घकालीन राजकीय यशासाठी परस्पर विश्वास आणि सामूहिक जबाबदारी आवश्यक असते. महायुतीने 'माझा पक्ष' या भूमिकेपलीकडे जाऊन 'आपली युती' ही भावना जपली नाही, तर आजचे अंतर्गत मतभेद उद्याच्या राजकीय संकटाचे कारण ठरू शकतात.

## प्रासंगिक »

### हरवलेला खजिना

**एका गावात नील नावाचा मुलगा राहत होता. त्याला जुन्या वस्तू गोळा करण्याचा छंद होता. एके दिवशी त्याला आजोबांच्या पेटीत एक जुना नकाशा सापडला. त्या नकाशात गावाजवळील टेकडीवर खजिना असल्याची खूण होती.**

नीलने मित्रांना सोबत घेतले आणि खजिना शोधायला सुरुवात केली. अनेक तास फिरूनही त्यांना काहीच सापडले नाही. शेवटी निराश होऊन ते परत निघाले. वाटेत त्यांना एक वृद्ध माणूस भेटला. त्याने मुलांना विचारले, "काय शोधत आहात?"

नीलने नकाशा दाखवला. वृद्ध माणूस हसून म्हणाला, "हा नकाशा माझ्या वडिलांनी तयार केला होता. त्या जागी खजिना नाही, तर पाण्याचा जुना झरा आहे." मुलांनी उत्सुकतेने ती जागा शोधली. झरा मातीने बुजला होता. सर्वांनी मिळून माती बाजूला केली. थोड्याच वेळात स्वच्छ पाणी वाहू लागले. गावकऱ्यांना पाण्याचा मोठा आधार मिळाला.

नीलला समजले की खजिना म्हणजे नेहमी सोने-चांदीच नसते. कधी कधी आपल्या प्रयत्नांतून सापडलेली एखादी उपयुक्त गोष्ट संपूर्ण गावासाठी अमूल्य ठरते.

- तात्पर्य : **खऱ्या संपत्तीचे मूल्य तिच्या उपयोगात असते, किमतीत नाही.**

लोकशाही व्यवस्थेत आंदोलनाचा अधिकार हा नागरिकांच्या मूलभूत स्वातंत्र्याचा महत्त्वाचा भाग आहे. सरकारच्या निर्णयांविरोधात असहमती व्यक्त करणे, प्रश्न विचारणे आणि न्यायाची मागणी करणे, हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे.

# आंदोलन दडपण्याचा अतिरेक कशासाठी?



मात्र, दिल्लीतील जंतरमंतरवर आंदोलन करण्यासाठी निघालेल्या आंदोलकांना रोखण्यासाठी करण्यात आलेली नाकेबंदी, पोलिसी बळाचा वापर आणि मोठ्या प्रमाणावर केलेली धरपकड पाहता, सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. आंदोलन सुरू होण्यापूर्वीच त्याला रोखण्याची एवढी घाई कशासाठी, हा प्रश्न उपस्थित होतो.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉक्रोच जनता पार्टीने आंदोलन पुकारले होते. निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल मतदारयादी पुनरीक्षण मोहिमेतील कथित त्रुटी आणि फॉर्म-६ मधील बदलांवरून राजकीय पक्षांनी आक्षेप घेतले आहेत. या आरोपांची सत्यता तपासणे आणि संबंधित प्रश्नांची उत्तरे देणे आवश्यक आहे. आंदोलनामागील राजकीय हेतूंबाबत मतभेद असू शकतात; परंतु त्यामुळे आंदोलनाचा घटनात्मक अधिकार संपुष्टात येत नाही.

आंदोलनात सहभागी होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा हेतू सारखाच असेल, असेही नाही. सीजेपीच्या आंदोलनाला राजकीय पक्षांच्या नेत्यांनी पाठिंबा दिल्याने त्याचे राजकीय स्वरूप ठळक झाले. तरीही आंदोलनातील मुद्दे चुकीचे असतील, तर सरकारने पुराव्यांच्या आधारे त्यांचे खंडन करावे. आंदोलकांशी संवाद साधून गैरसमज दूर करण्याचा मार्ग उपलब्ध असताना कठोर प्रतिबंधांचा अवलंब करणे लोकशाहीला शोभणारे नाही. याहून गंभीर बाब म्हणजे आंदोलकांवर झालेल्या कथित मारहाणीचे वृत्त. विशेषतः महिला आंदोलकांशी गैरवर्तन झाल्याचे आरोप चिंताजनक आहेत. कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलिसांची आहे. आंदोलकांवर हल्ले होत असताना पोलिसांनी मूकदर्शक राहिल्याचे आरोप खरे असतील, तर त्याची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. कोणत्याही संघटनेला कायदा हातात घेण्याचा अधिकार नाही. पोलिसांच्या उपस्थितीत हिंसाचार घडत असेल, तर प्रशासनाच्या निष्पक्षतेवर प्रश्न निर्माण होतात. सरकारने विरोधाचा आवाज दडपण्याऐवजी त्यामागील कारणे समजून घेण्याची गरज आहे. शांततापूर्ण आंदोलनामुळे सरकार कोसळत नाही; उलट, जनतेच्या प्रश्नांना सामोरे जाण्याची संधी मिळते. सर्वोच्च न्यायालयानेही आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मेट्रो बंद करणे आणि बॅरिकेड लावण्यासंदर्भात प्रश्न उपस्थित केले आहेत. सार्वजनिक व्यवस्था राखताना नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर अनावश्यक परिणाम होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे.

लोकशाहीची ताकद विरोधकांना गप्प करण्यात नसून विरोधी मतांना सामावून घेण्यात असते. निवडणूक आयोगावरील आरोपांची सत्यता, आंदोलकांच्या मागण्या आणि पोलिसांच्या कारवाईची आवश्यकता या सर्व बाबींची पारदर्शकपणे तपासणी व्हावी. अन्यथा, प्रश्न विचारणाऱ्यांना विरोधक समजून दडपण्याची प्रवृत्ती वाढेल. सत्ता कितीही मजबूत असली, तरी जनतेचा विश्वास गमावणे परवडणारे नाही. आंदोलनाचा अतिरेक रोखण्याच्या नावाखाली सरकारी यंत्रणेचाच अतिरेक होत असेल, तर तो लोकशाहीसाठी अधिक धोकादायक ठरतो.

## ॥ अभंगवाणी ॥



हो का पुत्र पत्नी बंधु ।
त्यांचा तोडावा संबंधु ॥१॥

कळों आलें खट्याळसें ।
शिवों नये लिंपों दोषें ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मतदारयादीत नाव नोंदणीसाठी पुन्हा मुदतवाढ

## मतदारयादी सखोल तपासणी मोहिमेला अल्प प्रतिसाद मिळाल्याने निवडणूक आयोगाचा निर्णय

**महाईन्यूज । मुंबई**

**राज्यात राबविण्यात येत असलेल्या मतदार याद्यांची विशेष सखोल तपासणी(एसआयआर) मोहिमेंतर्गत नवमतदारांसह प्रारूप मतदार यादीत नाव नसलेल्या पात्र नागरिकांना आपले नाव मतदार यादीत नोंदविण्यासाठी पुन्हा एकदा दत्तवाड देण्याचा निर्णय केंद्रीय निवडणूक आयोगाने घेतला आहे त्यानुसार राज्यात मतदारांना पाठवण्यात आलेल्या नोटिसीना उत्तर देण्यासाठी तसेच प्रारूप मतदार यादीत नाव नोंदणी करण्यासाठी पुन्हा मुदतवाढ देण्यात आली आहे.**

निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार गेल्या दोन महिन्यांपासून राज्यात मतदार याद्यांची विशेष सखोल तपासणी मोहिम राबविली जात आहे. ३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीत यापूर्वीच्या मतदार यादीतील २ कोटी मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. या मतदारांना पुन्हा मतदार यादीत नांवे नोंदविण्यासाठी संधी देण्यात आली असून आतापर्यंत ७ लाख १९ हजार ३८२ मतदारांनी नमुना-६ मध्ये अर्ज दाखल केले आहेत. मतदार यादीतील नोंदींमध्ये दुरुस्तीसाठी ३ लाख ९९ हजार ९२५ मतदारांनी अर्ज नमुना-८ मध्ये, तर नावे वगळण्यासाठी १८ हजार ७४८ अर्ज नमुना-७ मध्ये अर्ज दाखल केले आहेत.

राज्यात या मोहिमेला मतदारांकडून फारसा प्रतिसाद मिळत नसल्याने सद्यस्थितीत प्रारूप मतदार यादी अंतिम केल्यास राज्यात लाखो मतदारांची नावे मतदार यादीतून बाहेर जातील त्यामुळे मोठा पक्ष निर्माण होईल अशी भीती व्यक्त करीत पुन्हा एकदा मदत वाढ देण्याची मागणी राज्याच्या मुख्य निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी केंद्र निवडणूक आयोगाला केली होती.

सध्या देशभरात निवडणूक आयोगा विरोधात मतदारांमध्ये संतापाचे वातावरण असून अशातच महाराष्ट्रातील कोट्यवशी मतदारांची नावे कमी झाल्यास त्याचे खापर आयोगावर फोडले जाईल, या धास्तीने आयोगाने राज्यात या मोहिमेला पुन्हा वाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सध्याच्या प्रारूप मतदार यादीत नाव नोंदणी करण्यासाठी आयोगाने पाठवलेल्या नोटिसीला उत्तर देण्यासाठी आणि प्रारूप मतदार यादीतील बदलाबाबत हरकती दाखल करण्यासाठी 26 ऑक्टोबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. आयोगाच्या यापूर्वीच्या आदेशानुसार ही मुदत आज संपणार होती.




### सुधारित आदेशानुसार

१ ऑक्टोबर या अर्हता दिनांकास किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण करणारे नवमतदार तसेच अन्य पात्र असूनही प्रारूप मतदार यादीत नाव समाविष्ट न झालेल्या नागरिकांना नमुना-६ भरून नाव नोंदविता येतील. त्यासाठी हे अर्ज संबंधित मतदार नोंदणी अधिकारी, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी किंवा मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याकडे ऑफलाइन पद्धतीने सादर करता येतील. तसेच ऑनलाइन अर्ज करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या HTTPS://VOTERS.ECI.GOV.IN/ या संकेतस्थळाचा वापर करता येईल. विशेष म्हणजे आयोगाने नोटिशीत नमूद केलेल्या आधार, शिधापत्रिका, पासपोर्ट अशा विविध १३ प्रकारच्या कागदपत्रांपैकी आवश्यक कागदपत्र उपलब्ध नसल्यास अन्य वैध कागदपत्रे किंवा दस्तऐवज सादर करता येतील. यासाठी अन्य कागदपत्रे ('ANY OTHER DOCUMENTS') हा पर्याय बीएलओ ॲपवर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

# शेतकऱ्यांना दुष्काळी परिस्थितीशी लढण्याची शक्ती मिळो : मुख्यमंत्री फडणवीस

**महाईन्यूज । नागपूर**

**राज्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दुपारी कोराडी येथील श्री महालक्ष्मी जगदंबा मातेचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी विधिवत पूजाअर्चा करून देवीचे आशीर्वाद घेतले. महाराष्ट्रावरील दुष्काळाच्या संकटाचा सामना करण्यासाठी राज्य शासन सज्ज असून, शेतकऱ्यांना या कठीण परिस्थितीशी लढण्याचे बळ मिळावे, अशी प्रार्थना त्यांनी देवीच्या चरणी केली.**

राज्यातील शेतकऱ्यांना प्रतिकूल परिस्थितीत धैर्याने उभे राहण्याची शक्ती मिळावी आणि दुष्काळाच्या संकटातून महाराष्ट्राला मार्ग काढता यावा, या भावनेतून मुख्यमंत्री फडणवीस यांनी देवीची पूजा केली. यावेळी राज्याचे महसूलमंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, गृह राज्यमंत्री पंकज भोयर, आमदार परिणय फुके आणि आमदार डॉ. राजीव पोतदार यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

कोराडी येथील श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानात दरवर्षी शारदीय नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा केला जातो. यंदाही धार्मिक परंपरेनुसार नवरात्रोत्सवाला उत्साहात प्रारंभ झाला आहे. नवरात्रोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी देवीच्या स्वयंभू मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविकांनी मंदिरात गर्दी केली.

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने देवीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे. मध्यरात्रीपासूनच भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. विदर्भासह महाराष्ट्राच्या विविध भागांतून तसेच अन्य राज्यांतूनही भाविक मोठ्या संख्येने कोराडी येथे दाखल होत आहेत. त्यामुळे मंदिर परिसरात दिवसभर भक्तिमय वातावरण पाहायला मिळत आहे.

देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची वाढती संख्या नवरात्रोत्सवातील श्रद्धा आणि धार्मिक परंपरेचे महत्त्व अधोरेखित करते. अशा भक्तिमय वातावरणात मुख्यमंत्री फडणवीस यांनी महालक्ष्मी जगदंबेचे दर्शन घेऊन राज्याच्या कल्याणासाठी आणि शेतकऱ्यांना दुष्काळाच्या संकटाचा सामना करण्याचे बळ मिळण्यासाठी प्रार्थना केली.



### मध्यरात्रीपासूनच दर्शनासाठी रांगा

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने देवीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे. मध्यरात्रीपासूनच भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. विदर्भासह महाराष्ट्राच्या विविध भागांतून तसेच अन्य राज्यांतूनही भाविक मोठ्या संख्येने कोराडी येथे दाखल होत आहेत. त्यामुळे मंदिर परिसरात दिवसभर भक्तिमय वातावरण पाहायला मिळत आहे.

# आता संपूर्ण देश जंतर-मंतर बनेल!

## अधिकृत जागांच्या यादीतून नाव हटवताच दिपकेंचा सरकारला इशारा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**दिल्ली पोलिसांनी जंतर-मंतर हे आंदोलने आणि निदर्शनांसाठीचे अधिकृत ठिकाण म्हणून रद्द केले असून, अशा जाहीर सभांसाठी तीन पर्यायी जागांची घोषणा केली आहे. दरम्यान, यावरून आता अभिजीत दिपके यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे.**



अभिजीत दिपके म्हणाले, “आंदोलनासाठी अधिकृत असलेल्या जागांच्या यादीतून जंतर मंतर वगळण्यात आलं आहे. ते आता आंदोलनाचे ठिकाण राहिलं नाही, कारण तसंही त्या भ्याड हुकूमशाहाने त्याचं युद्धभूमीत रूपांतर केलं होतं. आता संपूर्ण देश जंतरमंतर बनेल!”

कॉक्रोच जनता पार्टीचे नेते सौरव दास यांनीही प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, “नरेंद्र मोदी जंतर-मंतरला का घाबरत आहेत? जंतर-मंतर भारताच्या जनतेचं आहे. गृह मंत्रालयाने भारताच्या जनतेचा सल्ला घेतला होता का? कोणत्याही भागधारकांशी सल्लामसलत केली होती का? कोणत्याही संघटनांशी चर्चा केली होती का? लिहून घ्या, ज्याप्रमाणे ते जनतेच्या जंतर-मंतरची अधिसूचना रद्द करत आहेत, तसंच पंतप्रधान लवकरच भारतातील लोकशाहीची अधिसूचना रद्द करतील. हे पाऊल त्याच दिशेने आहे. हा मनमानी निर्णय आम्हाला मान्य नाही. हा लोकांच्या शांततापूर्ण एकत्र येण्याच्या आणि निषेध करण्याच्या मूलभूत अधिकारावर झालेला हल्ला आहे. आता संपूर्ण देश जंतरमंतर बनत आहे!”

कॉक्रोच जनता पार्टीला शांततापूर्ण आंदोलन करण्याची परवानगी देण्यावरून झालेला वाद आणि ‘इंडिया’ आघाडीच्या सर्वोच्च न्यायालयावरील नियोजित मोर्चाच्या पार्श्वभूमीवर राजधानीत वाढवण्यात आलेल्या सुरक्षेच्या दरम्यान हे पाऊल उचलण्यात आलं आहे. ११ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या स्थायी आदेशानुसार, रामलीला मैदान, सीबीडी ग्राउंड आणि बुरारी ग्राउंड ही तीन नवीन नियुक्त केलेली ठिकाणे आहेत. विशेष म्हणजे, ही तीन ठिकाणे मध्य दिल्लीत असलेल्या जंतर-मंतरपासून अनुक्रमे ३ किमी, १३.५ किमी आणि ४४ किमी अंतरावर आहेत.

सीजेपीचे मुख्य प्रवक्ते सौरव दास म्हणाले की, पक्षाने शांततापूर्ण आंदोलन करण्याच्या आपल्या हेतूविषयी पोलिसांना रीतसर कळवलं होतं आणि पोलिसांनी ती माहिती स्वीकारलीही होती. मात्र, आंदोलनासाठी कोणतीही तारीख देण्यात आलेली नाही आणि पक्षाला या निर्बंधांविषयी कोणतंही स्पष्टीकरण मिळालेलं नाही, असं त्यांनी सांगितलं. “आम्हाला तारीख देण्यासाठी आम्ही त्यांना २४ तासांचा वेळ दिला आहे”, असं सांगत दास यांनी इशारा दिला की, जर पोलिसांनी या मुदतीत प्रतिसाद दिला नाही तर सीजेपी मोर्चा काढण्याची घोषणा करेल.

### सीजेपीने मागितलं स्पष्टीकरण

**सीजेपी आणि दिल्ली पोलीस यांच्यात जंतरमंतर येथे शांततापूर्ण आंदोलन करण्याच्या परवानगीवरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर हा आदेश आला आहे. सीजेपीच्या नेत्यांनी सोमवारी पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाण्यातून बाहेर पडताना, आंदोलनासाठी तारीख देण्यात यावी अशी मागणी केली. तसेच परवानगी नाकारण्याबाबत स्पष्टीकरण मागितलं.**

## रॉबर्ट हॉल आणि मायकेल वुडफोर्ड यांना अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्कार जाहीर

**महाईन्यूज । स्वीडन**

**अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्कार यंदा रॉबर्ट ई. हॉल (Robert E. Hall) आणि मायकेल वूडफर्ड (Michael Woodford) यांना मॅक्रोइकॉनॉमिक स्टॅबिलायझेशनचे मायक्रोइकॉनॉमिक फाउंडेशन” या विषयावरील त्यांच्या संशोधनासाठी जाहीर करण्यात आला आहे. हॉल हे कॅलिफोर्नियातील स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीशी, तर वूडफर्ड हे न्यूयॉर्कमधील कोलंबिया युनिव्हर्सिटीशी संबंधित आहेत. स्टॉकहोममधील ‘द रॉयल स्वीडिश अकॅडमी ऑफ सायन्सेस’ने या दोन्ही अमेरिकन अर्थतज्ज्ञांच्या नावांची घोषणा केली.**





नोबेल कमिटीचे अध्यक्ष जॉन हॅस्लर यांच्या मते, “या विजेत्यांच्या संशोधनाने सध्या जगभरातील मध्यवर्ती बँका आणि सरकारांद्वारे वापरल्या जाणाऱ्या मॉडेल्सना एक भक्कम सैद्धांतिक आधार दिला आहे.” अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्काराला पूर्वी बँक ऑफ स्वीडन प्राइझ इन इकॉनॉमिक सायन्सेस इन मेमरी ऑफ अल्फ्रेड नोबेल म्हणून ओळखलं जात होतं.

या वर्षीच्या अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्काराची रक्कम ११ कोटी ४८ लाख रुपये ($1.2 million) इतकी आहे, जी वैयक्तिक विजेत्याला किंवा संस्थेला दिली जाते. हॉल आणि वूडफर्ड यांच्या संशोधनाने ‘न्यू केनेशियन मॉडेल्स’ (New Keynesian models) विकसित केले. हे मॉडेल स्थिरीकरण धोरणे आर्थिक चक्रांवर कसा परिणाम करतात हे स्पष्ट आणि मोजण्यास मदत करतात. सध्या जगभरातील मध्यवर्ती बँका आणि वित्त मंत्रालयांकडून याचा वापर केला जातो.




नोबेल समितीने नमूद केलं की, या अर्थतज्ज्ञांच्या संशोधनामुळे मोठ्या मॅक्रोइकॉनॉमिक संकटांचे व्यवस्थापन पूर्वीपेक्षा अधिक कार्यक्षम पद्धतीने करणं शक्य झालं आहे. समितीने ‘X’ वरील एका पोस्टमध्ये म्हटलं आहे की, हॉल आणि वूडफर्ड यांचं संशोधन अलीकडच्या वर्षांतील महामारी आणि ऊर्जा संकटाच्या काळात अत्यंत फायदेशीर ठरलं आहे; त्यामुळे १९७० च्या दशकातील गंभीर कालखंडासारखे आर्थिक वाढ आणि महागाईवर दीर्घकालीन परिणाम झाले नाहीत.

गेल्या आठवड्यात भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, शांतता, वैद्यकशास्त्र आणि साहित्य या क्षेत्रांतील नोबेल पुरस्कारांची घोषणा करण्यात आली होती.

# लावणीसम्राज्ञी मधू कांबीकर काळाच्या पडद्याआड..

मराठी चित्रपटसृष्टी आणि लोककलेच्या क्षेत्रातून दुःखद बातमी समोर आली आहे. ज्येष्ठ अभिनेत्री आणि प्रसिद्ध लावणी कलावंत मधू कांबीकर यांचं पुण्यात निधन झालं. त्या ७३ वर्षांच्या होत्या. लावणी, लोकनाट्य, नाटक आणि चित्रपट अशा विविध माध्यमांतून त्यांनी आपल्या अभिनयाची आणि कलेची वेगळी छाप उमटवली होती. त्यांच्या निधनामुळे मराठी मनोरंजनविश्वात शोक व्यक्त केला जात आहे.

मधू कांबीकर यांचा जन्म २८ जुलै १९५३ रोजी बीड जिल्ह्यातील माळेगाव खुर्द येथे झाला. ग्रामीण भागातून आलेल्या मधू कांबीकर यांनी आपल्या मेहनतीच्या आणि कलेच्या जोरावर मनोरंजनविश्वात स्वतःचं स्थान निर्माण केलं. त्यांचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला.

लहानपणापासूनच त्यांना नृत्य आणि अभिनयाची आवड होती. त्यांनी कथ्थक नृत्याचं प्रशिक्षण घेतलं. त्यानंतर १९७३ मध्ये मुंबईतील लालबाग येथील न्यू हनुमान थिएटरमधून त्यांच्या कलाप्रवासाला सुरुवात झाली. सुरुवातीपासूनच त्यांनी लावणी आणि लोकनृत्याच्या सादरीकरणातून प्रेक्षकांची मनं जिंकली. महाराष्ट्राच्या लोककलेची परंपरा जपताना त्यांनी आपल्या सादरीकरणातून ग्रामीण संस्कृतीचं दर्शन घडवलं. त्यांच्या कलेतून ग्रामीण भागातील जीवन, लोकपरंपरा आणि मराठी मातीशी असलेलं नातं प्रेक्षकांपर्यंत पोहोचत होतं.



मधू कांबीकर यांचं नाव घेतलं की मराठी लावणी आणि लोककलेची आठवण होते. लावणीच्या सादरीकरणात त्यांनी स्वतःची वेगळी शैली निर्माण केली होती. केवळ नृत्यच नव्हे, तर अभिनयाच्या माध्यमातूनही त्यांनी प्रेक्षकांवर छाप पाडली. लोकनाट्य आणि रंगभूमीवर काम करताना त्यांनी विविध प्रकारच्या भूमिका साकारल्या. लोककलेला केवळ मनोरंजनाचं माध्यम न मानता तिचं सांस्कृतिक महत्त्व जपण्यातही त्यांनी योगदान दिलं. ग्रामीण महाराष्ट्रातील लोककलेला व्यापक ओळख मिळवून देणाऱ्या कलाकारांमध्ये त्यांचं नाव महत्त्वाने घेतलं जातं.





## हुमाची पोस्ट चर्चेत!

अभिनेत्री हुमा कुरैशी सध्या तिच्या सोशल मीडिया पोस्टमुळे चर्चेत आली आहे. दिल्लीतील सीजेपीच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर हुमाने लोकशाही, नागरिकांचे अधिकार आणि शांततापूर्ण आंदोलन याबाबत आपली भूमिका मांडली आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येक नागरिकाला प्रश्न विचारण्याचा आणि आपले मत मांडण्याचा अधिकार असला पाहिजे, असे तिने म्हटले आहे. शांततेच्या मार्गाने विरोध व्यक्त करणे हा गुन्हा नसून तो प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार असल्याचेही हुमाने आपल्या पोस्टमधून स्पष्ट केले आहे. हुमाने तिच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये तिने भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश असल्याचा उल्लेख केला. शांततापूर्ण आंदोलन करणे आणि सत्तेत असलेल्यांकडून उत्तरदायित्वाची मागणी करणे, हे लोकशाहीतील मूलभूत अधिकार आहेत. हे अधिकार कोणत्याही सत्ताधाऱ्यांनी नागरिकांवर केलेले उपकार नाहीत, असे तिने म्हटले आहे. पुढे ती म्हणाली की, शांततेच्या मार्गाने असहमती व्यक्त करणे हा गुन्हा नाही. प्रश्न विचारणे किंवा एखाद्या विषयावर स्पष्टीकरण मागणेही चुकीचे नाही. नागरिकांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरे मिळावीत आणि सत्तेत असलेल्या व्यक्तींनी आपल्या निर्णयांबाबत जबाबदारी स्वीकारावी, अशी अपेक्षा ठेवणे हा लोकशाहीचा महत्त्वाचा भाग आहे. लोकशाहीमध्ये नागरिकांना कोणत्याही भीतीशिवाय आपले मत मांडता आले पाहिजे. त्यांना प्रश्न विचारल्यामुळे किंवा विरोधी भूमिका घेतल्यामुळे त्रास सहन करावा लागू नये, असेही हुमाने आपल्या पोस्टमध्ये नमूद केले आहे. शांततापूर्ण आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केल्यास लोकशाहीची मूल्ये कमकुवत होतात, असे मत तिने व्यक्त केले.

## 'द डर्टी पिक्चर 2'ची घोषणा!

अभिनेत्री विद्या बालनची प्रमुख भूमिका असलेला 'द डर्टी पिक्चर' चित्रपट 2011 मध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. यातील तिचा बोल्ड अंदाज विशेष चर्चेत राहिला. हा सिनेमा विद्याच्या करिअरमध्ये सर्वात महत्वाचा ठरला. एकता कपूरने या सिनेमाची निर्मिती केली होती. तर मिलन लुथरिया यांनी सिनेमा दिग्दर्शित केला होता. आता तब्बल 15 वर्षांनंतर या चित्रपटाच्या सिक्वेलची चर्चा सुरू झाली आहे. या सिनेमाच्या पार्ट २ची स्वत: एकता कपूरने ही माहिती दिली आहे. रणवीर अलाहाबादियाच्या पॉडकास्टमध्ये एकता कपूरने 'द डर्टी पिक्चर २'ची घोषणा केली. सिनेमाचं कामही सुरु झाल्याचं तिने सांगितलं. एकता म्हणाली, "मी सध्या एका मोठ्या सिनेमावर काम करत आहे. 'द डर्टी पिक्चर २' या सिनेमाचा मी १५ वर्षांनंतर प्लॅन करत आहे आणि मला वाटतं यावेळी माझ्याकडे जी कहाणी आहे ती मला सांगायची आहे. सीक्वेलमध्येही एका महिलेचीच कहाणी असणार आहे." मात्र यामध्ये मुख्य अभिनेत्री कोण असणार याची माहिती तिने दिलेली नाही. दरम्यान, २०११ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'द डर्टी पिक्चर' चित्रपटात विद्या बालन यांच्यासोबत नसीरुद्दीन शाह, इम्रान हाश्मी आणि तुषार कपूर मुख्य भूमिकेत होते. हा चित्रपट दाक्षिणात्य अभिनेत्री सिल्क स्मिता यांच्या जीवनापासून प्रेरित होता. सिल्क स्मिता यांनी आपल्या १८ वर्षांच्या कारकिर्दीत ४५० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले होते आणि वयाच्या ३५ व्या वर्षी चेन्नईमधील त्यांच्या राहत्या घरी त्यांनी आत्महत्या केली होती.

# रवींद्र जडेजाचा रणजी करंडकात शतकी धमाका!

## प्रेरक मंकडसोबत २०५ धावांची भागीदारी, सौराष्ट्रचा पहिला डाव ३९२ धावांवर आटोपला

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**रणजी करंडक स्पर्धेच्या नवीन हंगामाची सुरुवात रवींद्र जडेजाने शतकी खेळीने केली आहे. रवींद्र जडेजा सौराष्ट्रकडून खेळणा हे कळताच त्याच्यावर सर्वांच्या नजरा खिळल्या होत्या, कारण त्याच्याकडून दमदार कामगिरीची मोठी अपेक्षा होती. भारताच्या या अत्यंत अनुभवी अष्टपैलू खेळाडूने शतक झळकावत दणक्यात सुरूवात केली.**

सौराष्ट्र आणि छत्तीसगड यांच्यातील सामन्यात जडेजाने शानदार शतक ठोकलं आणि या कामगिरीतून त्याने आगामी न्यूझीलंड दौऱ्यासाठी आपण सज्ज असल्याचंही सिद्ध केलं. सौराष्ट्र आणि छत्तीसगड यांच्यात रणजी करंडक 'एलिट गट ब' मधील सामना खेळवला जात आहे. प्रथम फलंदाजी करताना सौराष्ट्र संघाने पहिल्या डावात ३९२ धावांत सर्व गडी गमावले.

रवींद्र जडेजाने संघासाठी २०९ चेंडूंत १०२ धावा केल्या; प्रथम श्रेणी क्रिकेटमधील हे त्याचं १६ वं शतक ठरलं. या खेळीदरम्यान त्याने सात चौकार लगावले. जडेजा बाद होताच संघाचा डाव संपुष्टात आला. रवींद्र जडेजाला शतकी खेळीनंतर धर्मेंद्रसिंह जडेजाने बाद केलं. रवींद्रव्यतिरिक्त प्रेरक मंकड यानेही संघासाठी शतकी खेळी केली; त्याने १५० चेंडूंत १२९ धावा केल्या, ज्यामध्ये १५ चौकार आणि एका षटकाराचा समावेश होता.

रवींद्र जडेजाने केवळ शतकच झळकावलं नाही, तर आपल्या खेळीदरम्यान महत्त्वपूर्ण भागीदारीही रचल्या. त्याने प्रेरक मंकडसह पाचव्या विकेटसाठी २९७ चेंडूंमध्ये २०५ धावांची भागीदारी केली, जी सौराष्ट्रसाठी या विकेटसाठीची सर्वोच्च भागीदारी ठरली. या भागीदारीदरम्यान प्रेरक मंकडने शतक केलं आणि १५० चेंडूंमध्ये १२९ धावा केल्या. रवींद्र जडेजा आणि प्रेरक मंकड यांनी केलेल्या शतकी खेळी आणि त्यांच्यातील द्विशतकी भागीदारीमुळेच सौराष्ट्र संघाने प्रथम फलंदाजी करताना ३९२ धावा केल्या.

छत्तीसगढच्या गोलंदाजांमध्ये देव आदित्य सिंगने उत्कृष्ट गोलंदाजी केली; त्याने २४ षटकांत ६७ धावा देत पाच बळी घेतले. रुद्र प्रताप आणि धर्मेंद्रसिंह जडेजा यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले, तर संदीप वॉरियरने एक बळी मिळवला. आता छत्तीसगडचा संघ आपल्या पहिल्या डावात किती धावा करतो आणि जडेजा किती विकेट्स घेणार यावर सर्वांच्या नजरा असणार आहेत.



## तुषार देशपांडेचे वादळ! रणजीत सनसनाटी हॅटट्रिक

**महाईन्यूज । मुंबई**

**मराठमोळा गोलंदाज तुषार देशपांडेने रणजी ट्रॉफी स्पर्धेत हॅटट्रिक घेतली आहे. विक्रमी सर्वाधिक वेळेस रणजी ट्रॉफी जिंकणाऱ्या मुंबई संघाने या स्पर्धेच्या नवीन हंगामाची शानदार सुरुवात केली आहे. मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर सुरू असलेल्या सामन्यात, यजमान संघाने फलंदाजी करताना एकूण ४२९ धावांची मजल मारली; त्यानंतर, तुषार देशपांडेने हॅटट्रिक घेत पाहुण्या चंदीगड संघाची दाणादाण उडवली.**

तुषार देशपांडेच्या भेदक गोलंदाजीपुढे चंदीगडने अवघ्या ३७ धावांत सात विकेट्स गमावल्या. तुषारने कमालीची हॅट्रिक साधून इतिहास आपल्या नावे केला आहे. रणजी ट्रॉफी स्पर्धेत हॅट्रिक घेणारा तो मुंबईचा सहावा गोलंदाज ठरला आहे.

आपल्या पहिल्या डावात फलंदाजीसाठी उतरलेल्या चंदीगड संघाला तुषार देशपांडे सातव्या षटकात पहिला धक्का दिला. त्यानंतर त्याने आपली भेदक गोलंदाजी कायम ठेवली. ११ व्या षटकात सलग तीन चेंडूंवर तीन फलंदाजांना बाद करून हॅट्रिक घेतली. देशपांडेने ११ व्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर अर्जुन आझादला बाद केलं, त्यानंतरच्या चेंडूवर शुभम भामरीला माघारी धाडलं आणि पाचव्या चेंडूवर दिपेंदर कुशाची विकेट घेत आपल्या हॅटट्रिकचा आनंद साजरा केला.

मुंबई आणि छत्तीसगड यांच्यात सध्या रणजी ट्रॉफी 'एलिट गट डी'मधील सामना सुरू आहे. प्रथम फलंदाजी करताना मुंबई संघाने एकूण ४२९ धावा केल्या. यामध्ये मुशीर खानने ६५, सिद्धेश लाडने ८६, तनुष कोटियनने ५८ आणि मोहित अवस्थीने ५६ धावांचं योगदान दिलं. कोणत्याही फलंदाजाने मोठी वैयक्तिक खेळी केली नसली तरीही सर्वांच्या एकत्रित योगदानामुळे संघाला मोठी धावसंख्या उभारता आली. सलामीवीर आणि स्टार खेळाडू यशस्वी जैस्वाल मात्र खाते न उघडताच बाद झाला.

छत्तीसगडने आठ बळी गमावले तोपर्यंत तुषार देशपांडेने त्यातील पाच बळी आपल्या नावावर केले होते. त्याने केवळ सात षटकं गोलंदाजी करत १७ धावा दिल्या आणि संघातील निम्म्या खेळाडूंना बाद केलं. छत्तीसगढच्या संघाने ८ विकेट्स गमावले तेव्हा १०० धावांचा टप्पाही गाठला नव्हता. आता पहिल्या डावाच्या बळावर मुंबई मोठी आणि महत्त्वपूर्ण आघाडी घेणार, हे जवळपास निश्चित झालं आहे. उर्वरित फलंदाज आणखी किती धावांची भर घालू शकतात, हे पाहणे रंजक ठरेल.



## साई सुदर्शन दुखापतग्रस्त!

**महाईन्यूज । मुंबई**



भारताचा मधल्या फळीतील फलंदाज साई सुदर्शन रणजी करंडक स्पर्धेत राजस्थानविरुद्धच्या लढतीत दुखापतग्रस्त झाला. जयपूर इथे हा सामना होत आहे. दुसऱ्या दिवशीचा खेळ सुरू झाला तेव्हा सुदर्शन कव्हर भागात क्षेत्ररक्षण करत होता. करन लांबाने लगावलेला ड्राईव्हचा फटका अडवताना त्याला दुखापत झाली. त्याला उठून उभं राहताना त्रास जाणवू लागला. फिजिओंनी मैदानात धाव घेत सुदर्शनवर उपचार केले. फटका अडवताना सुदर्शनच्या गुडघ्याला दुखापत झाली. मात्र ही दुखापत गंभीर नसल्याचं संघव्यवस्थापनाने स्पष्ट केलं. गुडघ्याला आईस पॅक लावण्यात आला. दुखापत बळावली नाही तर सुदर्शन क्षेत्ररक्षणाला येऊ शकतो असंही सांगण्यात आलं.

सुदर्शन फलंदाजी करू शकतो का हे पाहणं महत्त्वाचं आहे. साई सुदर्शन या सामन्यासाठी येणं अपेक्षित नव्हतं. तो ऑस्ट्रेलिया अ विरुद्धच्या भारतीय अ संघाचा भाग होता. तो पुदुच्चेरी इथे होता. रविवारी झालेल्या वनडेत साई सुदर्शनऐवजी प्रियांश आर्यला संधी देण्यात आली. त्यामुळे सुदर्शनने रणजी करंडक स्पर्धेसाठी रवाना होण्याचा निर्णय घेतला. रात्री उशिरा जयपूरला पोहोचला. तो निवडीसाठी उपलब्ध आहे हे तामिळनाडू निवडसमितीलाही ठाऊक नव्हतं.

ऑस्ट्रेलिया अ संघाविरुद्धच्या कसोटी मालिकेत सुदर्शनला चार डावात मिळून एकच अर्धशतकी खेळी करता आली. कसोटी मालिकेनंतर झालेल्या वनडेत १ आणि १३ एवढ्याच धावा करता आल्या. पायाला झालेल्या दुखापतीतून सुदर्शन सावरत होता. सुदर्शनऐवजी देवदत्त पड्डीकलला भारतीय संघात स्थान मिळालं. श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेत देवदत्तने दमदार कामगिरी करत संघाच्या व्यवस्थापनाचा विश्वास सार्थ ठरवला. न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेपूर्वी भारत अ संघाविरुद्ध कसोटी मालिका होणार आहे. त्यासाठी सुदर्शनाची निवड झाली आहे. सोमवारी झालेली दुखापत गंभीर नसल्याने सुदर्शन न्यूझीलंडला रवाना होईल अशी चिन्हं आहेत.

स्मार्ट PCMC
SMART CITY

# महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper
। मंगळवार ।
दि. 13 ऑक्टोबर 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# दिव्या क्लासेसच्या वर्धापन दिनानिमित्त मोशीत वृक्षारोपण!

## विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग; पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती

**महाईन्यूज ।** पिंपरी-चिंचवड

**पर्यावरणाचे संरक्षण, निसर्गाचे संवर्धन आणि भावी पिढ्यांमध्ये वृक्षप्रेमाची भावना रुजविण्याच्या उद्देशाने दिव्या शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे संचलित दिव्या क्लासेस, दिघी यांच्या १३ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित वृक्षारोपण सोहळा धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज स्मारक परिसर, मोशी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या उपक्रमात विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.**




शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या दिव्या क्लासेसने आपल्या १३ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून केवळ शैक्षणिक उपक्रमांपुरते मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकी जपणारा पर्यावरणपूरक उपक्रम राबविला. वृक्षारोपणाच्या माध्यमातून निसर्गाशी नाते दृढ करणे, पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव विकसित करणे, हा या उपक्रमामागील महत्त्वाचा उद्देश होता.

या वेळी उपस्थित विद्यार्थ्यांना वृक्षांचे मानवी जीवनातील महत्त्व, पर्यावरणाचा समतोल राखण्यात झाडांची भूमिका तसेच वृक्षारोपणाबरोबरच वृक्षांचे संगोपन आणि संवर्धन करण्याची आवश्यकता याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. केवळ झाडे लावणे पुरेसे नसून त्यांना नियमित पाणी देणे, त्यांची काळजी घेणे आणि ती मोठी होईपर्यंत त्यांचे संरक्षण करणे आवश्यक आहे, याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाची सवय लहान वयापासूनच रुजल्यास भविष्यात अधिक जबाबदार आणि निसर्गप्रेमी पिढी घडण्यास मदत होईल, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमात सहभागी झालेल्या उपस्थितांना पाण्याच्या बाटल्यांचे भेटवाटप करण्यात आले. वृक्षारोपणासारख्या विधायक उपक्रमातून सामाजिक एकोपा वाढविण्यासोबतच पर्यावरणपूरक विचारांचा प्रसार करण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आला.

या कार्यक्रमाला यशस्वी उद्योजक व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रतापराव मोहिते मामा यांच्यासह मान्यवर शिक्षक आणि हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे पदाधिकारी उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी एकत्र येत पर्यावरण संवर्धनाच्या कार्यात सहभाग घेतल्याने संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

### ‘वृक्ष लावा, वृक्ष जगवा; पर्यावरणाचे रक्षण करा!’

पर्यावरण संवर्धनासाठी ‘वृक्ष लावा, वृक्ष जगवा; पर्यावरणाचे रक्षण करा!’ संदेशाला कृतीची जोड देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. पर्यावरण संवर्धनाची ही जाणीव केवळ एका दिवसापुरती मर्यादित न राहता प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाचा भाग व्हावी, अशी भावना या कार्यक्रमातून व्यक्त झाली.

### वर्धापन दिनाला सामाजिक उपक्रमाची जोड

वर्धापन दिन हा संस्थेच्या शैक्षणिक प्रवासाचा महत्त्वाचा टप्पा असतो. मात्र, अशा आनंदाच्या प्रसंगी समाज आणि पर्यावरणाप्रती आपली जबाबदारी ओळखून विधायक उपक्रम राबविणे हीदेखील काळाची गरज आहे. दिव्या क्लासेसने वृक्षारोपण सोहळ्याच्या माध्यमातून शिक्षणासोबतच पर्यावरणीय जाणीव आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश दिला.

# प्रतिभा ज्युनिअर कॉलेजच्या आंतरशालेय व कनिष्ठ महाविद्यालयीन स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**महाईन्यूज ।** पिंपरी- चिंचवड

**चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा ज्युनिअर कॉलेज, यांच्या वतीने आयोजित पिंपरी चिंचवड शहराअंतर्गत आंतरशालेय व कनिष्ठ महाविद्यालयीन स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**




विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, भाषिक कौशल्ये विकसित करणे आणि सकारात्मक स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे या उद्देशाने वक्तृत्व, निबंधलेखन, कथाकथन आणि एकपात्री नाटक अशा चार स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये एकूण १९ शैक्षणिक संस्थांमधील १७७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आपली प्रतिभा, सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि अभिव्यक्ती कौशल्यांचे प्रभावी सादरीकरण केले. त्याचे उद्घाटन प्रतिभा ज्यूनिअर कॉलेज्या प्राचार्या डॉ . वनिता कुऱ्हाडे समवेत प्रथम नोंदणी करणाऱ्या शिक्षीका तनीषा आंबरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

सदर स्पर्धांचे परीक्षण डॉ. सुवर्णा गायकवाड, डॉ. महिमा सिंह ,डॉ. सुवर्णा गोगटे, प्रा. गीता कांबळे, प्रा. सुशील भोंग, डॉ. राजश्री ननावरे, डॉ. संतोष उमाठे आणि प्रा. अमोल पाटील यांनी केले. परीक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे सखोल मूल्यमापन करून त्यांच्या गुणवत्तेला योग्य न्याय दिला.

कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा, संस्थेच्या खजिनदार डॉ. भूपाली शहा, संचालिका डॉ. तेजल शहा, यांच्या प्रोत्साहनामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणाऱ्या अशा शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांना प्रेरणा मिळत असल्याचे प्राचार्या डॉ. वनिता कुऱ्हाडे यांनी उद्घाटन प्रसंगी सांगितले. त्याच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धाचे नियोजन करण्यात आले . भाषा विभाग प्रमुख प्रा. सुरेखा कुंभार व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना विचार प्रभावीपणे मांडण्याची, भाषेवरील प्रभुत्व वाढविण्याची, कल्पकतेला वाव देण्याची आणि आत्मविश्वासाने व्यक्त होण्याची संधी मिळाली. सर्व विजेत्या व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रवींद्र निरगुडे यांनी केले, तर प्रा. स्नेहल साळवी यांनी आभार प्रदर्शन केले.

### स्पर्धांचे निकाल पुढीलप्रमाणे :

- **वक्तृत्व स्पर्धा :**
  प्रथम क्रमांक - कु. रविना चौधरी आणि कु. वेदिका विभूते, द्वितीय क्रमांक - कु. सोनाली वाघमारे, तृतीय क्रमांक - कु. सिद्धी माने.
- **निबंध लेखन स्पर्धा :**
  प्रथम क्रमांक - कु. जोहा सुलतान मोमीन आणि कु. श्रुती समर्थ स्वामी, द्वितीय क्रमांक - कु. श्रुती बिरादार, तृतीय क्रमांक - कु. गौरी राजू लष्करे.
- **कथाकथन स्पर्धा :**
  प्रथम क्रमांक कु. अनुष्का मौर्या, द्वितीय क्रमांक - कु. सुजाता सरोज आणि कु. अंकिता वरुण, तृतीय क्रमांक - कु. सलोनी कांबळे.
- **एकपात्री नाटक स्पर्धा :**
  प्रथम क्रमांक - कु. ऐश्वर्या यादव, द्वितीय क्रमांक - कु. नव्या सिंह, तृतीय क्रमांक - कु. कुंजन भाटी.

# महानगरपालिकेचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

## नगरीचे शिल्पकार ,माजी नगराध्यक्ष दिवंगत अण्णासाहेब मगर यांना अभिवादन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**महानगरपालिकेच्या ४४ व्या वर्धापन दिनानिमित्त महापालिकेच्या पिंपरी येथील प्रशासकीय इमारतीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी यांनी महापौर रवि लांडगे यांच्या उपस्थितीत प्रांगणातील अण्णासाहेब मगर यांच्या प्रतिमेस तसेच पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.**



> पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा वर्धापन दिन हा शहराच्या विकासप्रवासाचा आणि सामूहिक कर्तृत्वाचा गौरव करणारा दिवस आहे. यानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरातून सामाजिक बांधिलकीचा, तर विविध स्पर्धांमधून संघभावना आणि एकोप्याचा संदेश देण्यात आला. “कटिबध्दा जनहिताय” या ब्रीदवाक्याप्रमाणे नागरिकांना अधिक दर्जेदार व लोकाभिमुख सेवा देण्यासाठी महापालिका प्रशासन सदैव कटिबद्ध आहे. - डॉ. विजय सुर्यवंशी, आयुक्त.

यावेळी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, अतिरिक्त आयुक्त कुलदिप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, मुख्य लेखा परिक्षक प्रमोद भोसले, सह आयुक्त मनोज लोणकर, शहर अभियंता मनोज सेठीया,मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, उप आयुक्त अण्णा बोदडे, सचिन पवार, व्यंकटेश दुर्वास, संदीप खोत, पंकज पाटील, सह शहर अभियंता बापू गायकवाड, विशेष अधिकारी किरण गायकवाड, प्रशासन अधिकारी दत्ता सुर्यवंशी, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, पिंपरी चिंचवड कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष बबन झिंजुर्डे, उपाध्यक्षा सुप्रिया जाधव, महादेव बोत्रे तसेच विविध विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड शहराच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या दिवंगत अण्णासाहेब मगर यांच्या कार्याचे स्मरण करत महापालिकेच्या लोकसेवेला यावेळी उजाळा देण्यात आला. औद्योगिक नगरीपासून आधुनिक आणि वेगाने विकसित होणाऱ्या शहरापर्यंतचा पिंपरी-चिंचवडचा प्रवास हा दूरदृष्टी, सातत्यपूर्ण विकासकार्य आणि नागरिकांच्या सहभागातून घडला असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

महानगरपालिकेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आयोजित रक्तदान शिबिराच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. रक्तदानासारख्या जीवनदायी उपक्रमातून समाजाप्रती असलेली जबाबदारी अधोरेखित करण्यात आली. वर्धापन दिनाचा आनंद साजरा करतानाच समाजहिताच्या उपक्रमांना प्राधान्य देण्याचा सकारात्मक दृष्टिकोन या आयोजनातून दिसून आला.

रस्सीखेच स्पर्धेतून संघभावनेचे दर्शन; पैठणीच्या खेळाने वाढवली रंगत वर्धापन दिनानिमित्त महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अधिकारी आणि कर्मचाऱ्यांदरम्यान झालेली रस्सीखेच स्पर्धा विशेष आकर्षण ठरली.स्पर्धकांनी दाखवलेला उत्साह, जिद्द आणि संघभावना यामुळे कार्यक्रमात चैतन्य निर्माण झाले. दैनंदिन प्रशासकीय कामकाजाच्या जबाबदाऱ्यांमधून काही क्षण विरंगुळ्याचे मिळाल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्पर्धांचा आनंद घेतला.

तसेच महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित पैठणीच्या खेळाने कार्यक्रमात विशेष रंगत आणली. विविध खेळ आणि मनोरंजनात्मक स्पर्धांमध्ये महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या उपक्रमांमुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांमधील स्नेहभाव, परस्पर संवाद आणि सांघिक एकोपा वृद्धिंगत होण्यास मदत झाली. वर्धापन दिनानिमित्त आयोजित या स्पर्धांमुळे महापालिका परिवारात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने आपल्या विकासप्रवासात नागरी सुविधा, पायाभूत विकास, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता आणि सार्वजनिक सेवांच्या माध्यमातून शहराच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. शहराच्या गौरवशाली वारशाचे जतन करत बदलत्या काळानुसार आधुनिक सुविधा आणि लोकाभिमुख प्रशासनाच्या माध्यमातून नागरिकांचे जीवनमान अधिक उंचावण्याचा संकल्प यानिमित्ताने व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.



# राजमाता जिजाऊ कॉलेजला अजिंक्यपद!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विभागीय क्रीडा समिती आणि राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या पुणे विभागीय आंतरमहाविद्यालयीन व्हॉलिबॉल स्पर्धेत यजमान राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाच्या (RJSPM) संघाने बाजी मारत अजिंक्यपद पटकावले आहे. तीन दिवस चाललेल्या या क्रीडा महोत्सवात पुणे विभागातील तब्बल ७६ महाविद्यालयांच्या संघांनी सहभाग नोंदवून उत्स्फूर्त खेळ सादर केला.

स्पर्धेतील अंतिम सामना RJSPM संघ आणि एआयटी (AIT) संघ यांच्यात अत्यंत अटीतटीचा झाला. दोन्ही संघांनी सुरुवातीपासूनच उत्कृष्ट समन्वय आणि आक्रमक खेळाचे प्रदर्शन केले. अखेर निर्णायक क्षणी उत्कृष्ट खेळाचे कौशल्य दाखवत यजमान RJSPM संघाने प्रतिस्पर्ध्यांना नमवून विजेतेपदावर आपले नाव कोरले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी पुणे विद्यापीठाचे विभागीय सहसचिव व क्रीडा संचालक डॉ. गणेश चव्हाण, प्रा. पानसरे, स्वाती मॅडम, श्री. बोचरे, श्री. भोर व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या स्पर्धेसाठी संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष तथा भोसरीचे प्रथम आमदार विलास लांडे, सचिव सुधीर मुंगसे, खजिनदार अजित गव्हाणे, विश्वस्त विक्रांत लांडे, रजिस्ट्रार अश्विनी भोसले यांच्यासह प्राचार्य डॉ. कानडे, प्राचार्य डॉ. काकडे, प्राचार्य किरण चौधरी आणि प्राचार्य उर्मिला जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. अजिंक्यपद पटकावणाऱ्या विजेत्या संघाचे आणि सर्व खेळाडूंचे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व विविध महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये विशेष व्याख्यान व पारितोषिक वितरण

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाच्या डुडुळगाव शैक्षणिक संकुलातील कॉलेज ऑफ फार्मसी येथे जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त ‘प्रतिजैविक प्रतिकारशक्तीशी लढा’ या संकल्पनेवर आधारित विशेष कार्यक्रम उत्साहात पार पडला.**



कार्यक्रमास कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. अमोल कुंभार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मेडिकोव्हर हॉस्पिटलच्या डॉ. नुपूर केदारे यांचे विशेष मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

आपल्या मार्गदर्शनात डॉ. नुपूर केदारे यांनी प्रतिजैविकांचा अयोग्य व अतिवापरामुळे निर्माण होणाऱ्या प्रतिजैविक प्रतिकारशक्तीच्या समस्येवर प्रकाश टाकला. प्रतिजैविकांचा योग्य, आवश्यक आणि जबाबदार वापर करणे गरजेचे असून, या संदर्भात जनजागृती करण्यामध्ये फार्मासिस्टची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी घोषवाक्य लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून प्रतिजैविक प्रतिकारशक्तीविषयी जनजागृती करणारी प्रभावी घोषवाक्ये सादर केली. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष व भोसरी विधानसभा मतदारसंघाचे प्रथम आमदार श्री. विलास लांडे, संस्थेचे सचिव मा. श्री. सुधीर मुंगसे, खजिनदार श्री. अजित गव्हाणे, विश्वस्त मा. श्री. विक्रांतजी लांडे तसेच विश्वस्त मा. श्री. सुमित मुंगसे यांनी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त आयोजित या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये प्रतिजैविक प्रतिकारशक्तीविषयी जागरूकता निर्माण होण्याबरोबरच भविष्यातील फार्मासिस्ट म्हणून त्यांची सामाजिक, नैतिक व व्यावसायिक जबाबदारी अधोरेखित झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046